जळगाव (प्रतिनिधी) दि. ०३ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भौतिकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. जे.व्ही. साळी यांची व्यवस्थापन परिषदेवर एक वर्षासाठी नामनिर्देशन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम ३०(४)(ई) अंतर्गत विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ संस्थांच्या प्रमुख किंवा संचालकांमधून व्यवस्थापन परिषदेचे सदस्य म्हणून प्रा. जे.व्ही. साळी, संचालक, भौतिकशास्त्र प्रशाळा यांना पुढील एक वर्ष कालावधीकरीता कुलगरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी नामनिर्देशन केले आहे.

**बातमी क्रमांक २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. ०३ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात प्रवेश परिचय कार्यक्रमांतर्गत विद्यापीठातील संरक्षण शास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. तुषार रायसिंग यांचे "भारताच्या परराष्ट्र धोरणातील समकालीन आव्हाने" या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन सोमवार दि. ०१ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. रायसिंग म्हणाले की, भारताचे आपल्या सीमेवरील देशांसोबतचे आंतरराष्ट्रीय संबंध ते अमेरिका रशिया यांसारख्या विकसित देशांसोबत परराष्ट्र धोरण हे चांगले आहे. मात्र या देशाशी व्यापारी संबंध ठेवताना आपल्या देशातील शेतकरी, युवक यांचे देखील होत जोपासले पाहिजे. पाकिस्तान सोबतची युद्ध संघर्ष ऑपरेशन याची माहिती समजावून सांगत ऑपरेशन सिंदूर ते अमेरिकेने लावलेले याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय मनोगतात भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे म्हणाले की, भारताला आपले परराष्ट्रीय धोरण आखत असताना आपल्या देशांतर्गत शेती, शेतकरी, युवक यांच्या समस्यांकडे देखील लक्ष देणे गरजेचे आहे. अंतर्गत राजकीय गृहयुद्धामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिमा मलिन होऊन त्याचा फायदा शत्रू राष्ट्रांना घेता येऊ नये यासाठी भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने काळजी घेतली पाहिजे. यासोबत रशियाचीन तसेच अमेरिका यासारख्या देशांसोबत व्यापारी संबंध प्रस्थापित करताना आपल्या काही कमजोर बाबींवर भाष्य करण्याची संधी त्यांना मिळता कामा नये असे देखील यावेळी ते म्हणाले.

आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंग्रजी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक कृष्णा सदानशिव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारती सोनवणे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. प्रीती सोनी यांनी केले. यावेळी डॉ. सुदर्शन भवरे, डॉ. दीपक खरात, भारती सोनवणे, प्रतिभा गलवाडे, स्नेहा गायकवाड, प्रीती मनुचारी, नेहा लाम्हणे, हेमराज पाटील महेश सूर्यवंशी यासह विद्यार्थी उपस्थित होते.

**बातमी क्रमांक ३**

जळगाव (प्रतिनिधी) दि. ०३ :- अभिव्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्व देत निरक्षर लोकांमध्येही लोकशाही यशस्वी होऊ शकते याची जाणीव जगाला करून देण्याचे कार्य भारतीय संविधानाने केले आहे असे प्रतिपादन डॉ. संदीप नेरकर यांनी केले आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात प्रवेश परिचय कार्यक्रमानिमित्त भारतीय संविधानाची पंचाहत्तरी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन मंगळवार दि. २ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. म.सू. पगारे, प्रा. प्रीती सोनी, डॉ. सुदर्शन भवरे, डॉ. दीपक खरात आदी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. नेरकर म्हणले की, भारत स्वातंत्र्यानंतर संविधानाने प्रत्येक नागरिकांच्या मूलभूत अधिकाऱ्यांना केंद्रस्थानी ठेवत देशासमोर आलेल्या अनेक आव्हानांना सामोरे जात यशस्वी वाटचाल पूर्ण केली असल्याचे सांगत भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया ते आज पर्यंत झालेल्या घटना दुरुस्ती यासंदर्भात सविस्तर माहिती दिली.

अध्यक्षीय समारोप करताना प्रा. पगारे म्हणाले की, स्वातंत्र्य समता आणि बंधुता या तीन तत्व आपल्या देशाचा प्राण आहे. धर्म, जाती, संस्कृती, भाषा, रितीरिवाज अशा पद्धतीने विविधतेने नटलेल्या आपल्या देशाला अस्थिर न होऊ देता एक संघ ठेवण्याचे काम करत भारतीय संविधानाने ७५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. भारतीय संविधान हे जगाला युद्ध नको तर बुद्ध हवा असा संदेश देत असल्याची माहिती देखील त्यांनी दिली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका स्नेहा गायकवाड तर आभार प्रदर्शन इंग्रजी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक सुदर्शन भवरे यांनी केले. यावेळी कृष्णा सदानशिव, भारती सोनवणे, प्रतिभा गलवाडे, स्नेहा गायकवाड, प्रीती मनुचारी, नेहा लाम्हाणे, महेश सूर्यवंशी यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी विद्यापीठ प्रशाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

**बातमी क्रमांक ४**

जळगाव (प्रतिनिधी) दि. ०३ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील केंद्रिय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षातर्फे रसायनशास्त्र प्रशाळा, भौतिकशास्त्र प्रशाळा आणि पर्यावरण भूशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांसाठी मुलाखत कौशल्य या विषयावर विद्यापीठातील सिनेट सभागृहात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन शनिवार दि. ३० ऑगस्ट रोजी करण्यात आले होते.

या कार्यशाळेसाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. बी.जे. लाठी यांच्यासह केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक डॉ. उज्वल पाटील, पॉलिमर केमिस्ट्री चे विभाग प्रमुख प्रा. विकास गीते, रसायन शास्त्र प्रशाळेचे समन्वयक डॉ. अमरदीप पाटील, प्रा. धनंजय मोरे उपस्थित होते.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी आवश्यक कौशल्ये, मुलाखती करिता आपले परिचयपत्र कसे तयार करावे, आपले ज्ञान, कौशल्ये आणि क्षमता विकसित करणे, गटचर्चा संबंधीत सराव, मुलाखतीस जातांना कंपनीचा अभ्यास कसा करावा यासह प्रत्यक्ष मुलाखतीत कशा पद्धतीने प्रश्नांची उत्तरे द्यावी, उत्तम बोलण्याचं कौशल्य आणि भाषा या संदर्भात तज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक पवन बाविस्कर यांनी केले. व्यवस्थापन व सूत्रसंचालन प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा तर आभार प्रदर्शन चेतन सूर्यवंशी यांनी केले.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ३ सप्टेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता